महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सातारा

श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुल, रविवार पेठ, सातारा — ४१५ ००१

दूरध्वनी क्र. (०२१६२)२३७४३८,ब्लॉग — sataradso.blogspot.in, ई-मेल आय डी- dso_satar@yahoo.co.in

जिक्रीअ/क्रीशिप्रका/आयोजन/१७-१८/का-३/८९८

दिनांक : ८/०३/२०१८

प्रति,

मा. मुख्याध्यापक/प्राचार्य

---------------------------

---------------------------

विषय : महाराष्ट्राचे राज्याचे क्रीडा धोरण २०१२.
शिक्षकांसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन...

संदर्भ : शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रीधो-२०१२ /प्र.क्र.२५०/१२/क्रीयुसे-२,दि.२८ एप्रिल,२०१४.दिनांक:३१ /८/२०१५.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागा अंतर्गत संदर्भांकीत शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील शिक्षकांना खेळांची / क्रीडा विषयक तांत्रिक माहीती व्हावी. तसेच शालेय विद्यार्थांना खेळाचे प्रशिक्षण इत्यादी बाबत शास्त्रोक्त माहिती देता यावी यासाठी शिक्षकांनी करीता क्रीडा प्रशिक्षण योजना कार्यान्वित केलेली आहे.

सातारा जिल्ह्यातील क्रीडा शिक्षकांचे (माध्यमिक/प्राथमिक) प्रशिक्षण शिबीर कार्यक्रम खालिल प्रमाणे आयोजित करण्यात आलेला आहे.

**क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिबीर कालावधी | : | दि.१५ मार्च ते २४ मार्च २०१८ |
| २ | उपस्थिती | : | दि.१५ मार्च, २०१८ रोजी सकाळ १०.०० वाजता |
| ३ | प्रशिक्षण शिबीर स्थळ,निवास व भोजन व्यवस्था | : | श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुल,सातारा. |
| ४ | प्रशिक्षण शिबीर प्रारंभ | : | दि.१५ मार्च, २०१८ रोजी सकाळ १०.०० वाजता |
| ५ | प्रशिक्षण शिबीराकरिता संपर्क | : | श्री धारुरकर एस एस (क्रीडा अधिकारी) ८२७५२०६८७९ |
| ६ | प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या क्रीडा शिक्षक /मास्टर ट्रेनर यांचे नाव | : | श्री/श्रीमती |

शासनाच्या धोरनात्मक निर्णयाच्या अनुषंगाने क्रीडा प्रशिक्षण हे महत्वपुर्ण असल्याने शिक्षकांनी उपरोक्त आदेशाचे/सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.शैक्षणिक संस्थाच्या/शाळांच्या आस्थापना प्रमुखांना उक्त कालावधीत शिक्षकंना कार्यमुक्त करावे.सदर शिक्षकांची सेवा प्रशिक्षणासाठी वर्ग करण्यात येत आहेत.उपरोक्त प्रशिक्षण कालावधिमध्ये नियुक्त शिक्षकांची कोणतीही रजा मंजुर करण्यात येवू नये.तसेच नियुक्त केलेल्या शिक्षकांनी सदर प्रशिक्षासाठीची नियुक्ती रंद्द करण्याबाबत निम्न स्वाक्षरीतांना संपर्क करू नये. त्यांच्या प्रशिक्षणाचा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात यावा.

शिबीरास उपस्थित राहण्यापूर्वी अंमलात आणावयाच्या सूचना :

१.सदरचे शिबीर हे निवासी असल्याने,त्याप्रमाणे सर्व साहित्य सोबत आणणे आवश्यक आहे.

२.कोणत्याही प्रकारची मौल्यवान वस्तु सोबत बाळगू नये.

३.प्रशिक्षणार्थीस कोणत्याही प्रकारचा आजार असल्यास किंवा उपचार चालू असल्यास,त्याची माहिती संबंधित खेळाच्या प्रशिक्षकांना प्रशिक्षण सुरूवात होण्यापूर्वी द्यावी.

४.प्रशिक्षण कालावधीत क्रीडा गणवेश बंधनकारक राहील,तसेच प्रशिक्षणार्थींनी सोबत ट्रयाकसुट,क्रीडा गणवेश, शिट्टी,स्टॉप वॉच,नोट बुक इ.आवश्यक साहित्य सोबत ठेवावे.

५.प्रशिक्षणार्थींना शासन निर्णयातील तरतुदीनुसार निवास व भोजन व्यवस्था करण्यात येईल व प्रवास भंत्ता प्रदान करण्यात येईल.

प्रशिक्षण शिबीर पुर्ण केल्याचे व कार्यमुक्त केल्याचे निम्न स्वाक्षरीतांचे प्रमाणपत्र असल्या खेरीज पत्रात नमूद प्रशिक्षनार्थी / मास्टर ट्रेनर शिक्षक यांचे मार्च २०१८ या महिन्या पासून पुढील वेतन अद करू नये. आपना द्वारा आदेशाचा भंग झाल्यास [redacted] होणा-या आर्थीक नुकसानास आपनास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा क्रीडा अधिकारी<br>सातारा. | शिक्षणाधिकारी (प्राथ.)<br>जिल्हा परिषद,सातारा. | शिक्षणाधिकारी (माध्य.)<br>जिल्हा परिषद,सातारा. |

प्रत:

संबंधित शिक्षक/ मास्टर ट्रेनर (पत्राच्या तकत्यातील अ.क्र.६ येथे नमूद)

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

मा.उपसंचालक,शिक्षण विभाग,,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

मा.उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.